दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com
● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● रविवार दि.१० ऑगस्ट २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २५५ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये
● Beed (Mahmar) Daily Marathi ● Sunday 10 August 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 255 ● Pages 4 ● Rate 4 Rs

प्रतिनिधी नेमणे आहे
लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.

# गरजू पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार

# कर्जमाफीसाठी समिती नियुक्त, अहवाल आल्यानंतर अंतिम निर्णय : महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)–राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्ज माफीचा विषय लांबणीवर पडला नसून निवडणूक काळात भाजपाने कर्जमाफीचे आश्वासन दिले होते, ते पूर्ण करणार आणि गरजू व पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळेल, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकारांना सांगितले. महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले, 'योग्य शेतकऱ्यांना कर्जमाफी' देण्यावर सरकार भर देत आहे. त्यासाठी एक समिती नेमण्यात आली आहे, ती शेतकऱ्यांचे सर्वेक्षण करणार असून, त्या सर्वेक्षणानंतर गरजू आणि पात्र शेतकऱ्यांनाच कर्जमाफीचा लाभ मिळेल. कर्जमाफी ही 'मेरिट'वर झाली पाहिजे. ज्यांना खऱ्या अर्थाने मदत हवी आहे, अशा शेतकऱ्यांचा विचार केला जाईल. समाजातील सर्वात शेवटच्या घटकाला मदत करणे हे सरकारचे उद्दिष्ट आहे. समितीचा अहवाल आल्यानंतर कर्जमाफीबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल.**

गुंठेवारीमध्ये अडकलेल्या घरमालकांना दिलासा देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे सांगत बावनकुळे म्हणाले, तुकडेबंदी कायद्यामुळे ज्या मिळकतींची नोंदणी होत नाही, अशा घरमालकांच्या समस्यांवर लक्ष दिले जात आहे. संभाजीनगर आयुक्तांना २०११ पूर्वीच्या गुंठेवारीतील बांधकामांची यादी तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जास्त आकारणी केली असल्यास ती कमी करून सर्वसामान्यांना दिलासा देण्याचा विचार असल्याचेही त्यांनी सांगितले.

महसूल विभागातील अनेक जागांवर झालेली अतिक्रमणे, वर्ग–२ जमिनी वर्ग–१ मध्ये रूपांतरित करणे आणि पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमणे काढणे यांसारख्या विषयांवर काम सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. शैक्षणिक दाखल्यांसाठी लागणाऱ्या ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरची अट रद्द करण्यात आली आहे. घर बांधण्यासाठी लागणाऱ्या मुरमासाठी रॉयल्टी घेतली जाणार नाही. तसेच सिंधी समाजाला जागा मिळवून देण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.




### एनडीएचे नेते म्हणून शिंदेंची दिल्ली भेट

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दिल्ली भेटीबाबत बावनकुळे म्हणाले, एनडीएचे नेते म्हणून एकमेकांना भेटणे आवश्यक आहे. अनेक राजकीय गोष्टी असतात त्यासाठी समन्वय साधणे आवश्यक असल्याने या भेटी होतात. त्यामध्ये वेगळे काही नाही. त्याच पद्धतीने एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्याही भेटी होत असतात.

## लोकनेते गोपीनाथराव मुंडे पॅनेलच्या उमेदवारांनाच विजयी करा–बाजीराव भैय्या धर्माधिकारी

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

परळीतून सुरु झालेल्या व आज राज्यभरात विस्तार असणाऱ्या आणि सभासदांचे हित कायम जपणाऱ्या वैद्यनाथ बँकेचे संचालक मंडळ हे जबाबदार, विकासाची क्षमता, मजबूत आर्थिक स्थिती आणि प्रगतीशील वाटचाल करणारे असावे यासाठी लोकनेते गोपीनाथराव मुंडे पॅनेलच्या उमेदवारांनाच विजयी करा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी केले आहे.



राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे व माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या खंबीर नेतृत्वाखाली लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनल वैद्यनाथ बँक संचालक मंडळाची निवडणूक लढवत आहे. यापूर्वीच या पॅनलचे चार उमेदवार बिनविरोध निवडून आलेले आहेत. सहकारी बँकांमधील एक अग्रगण्य व परळीच्या अर्थकारणातील महत्त्वाचे आर्थिक केंद्र ठरलेल्या वैद्यनाथ बँकेशी परळीकरांचा एक स्नेहबंध आहे. परळीतील सर्वसामान्य नागरिक, छोटे,मोठे व्यावसायिक व सर्वच क्षेत्रातील नागरिकांनी सभासद या नात्याने आपली बँक म्हणून या बँकेच्या प्रगतीसाठी आणि बँकेचे राज्यभरात अग्रगण्य बँकेत रूपांतर होण्यासाठी सहयोग व योगदान दिलेले आहे. दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या नेतृत्वाखाली बँकेने राज्यभर आपला विस्तार व भरभराट केलेली आहे. पंकजाताई मुंडे व धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वातून भविष्यात बँक देशभरात आपला लौकिक करु शकते याचा सर्व सभासदांना विश्वास आहे. त्यामुळेच सभासदांचे हित जपणाऱ्या संचालक मंडळावर वर्षानुवर्षे सभासदांनी जबाबदारी टाकलेली आहे. या निवडणुकीतही ना. पंकजाताई मुंडे व धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखालील लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलला सभासद भरभरून आशीर्वाद देऊन बँकेचा सुरक्षित व प्रगतिशील कारभार करणाऱ्या उमेदवारांना निवडून देणार आहेत यात तिळमात्र शंका नाही. दहा ऑगस्ट रोजी होणाऱ्या निवडणुकीत लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या सर्व उमेदवारांना विमान चिन्हावर ठसा मारुन विजयी करावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी यांनी केले आहे.

## प्रकाश आंबेडकर नगर मधील गायरान धारकांना मालकी हक्क देणार–ना.पवार

### अशोक वीर यांच्या मागणीला यश

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री दोन दिवसाच्या बीड जिल्हा दौऱ्यावर होते त्यावेळी प्रकाश आंबेडकर येथील रहिवाशी तथा आंबेडकरी चळवळीचे नेते अशोक वीर यांनी शिष्टमंडळासह ना.अजित पवार यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे मागणी केली होती. त्याची तात्काळ दखल घेत जिल्हाधिकारी यांना आदेशित करण्यात आले आहे. प्रकाश आंबेडकर नगर येथील सर्व्हे नं. १०५ तरफ पिंगळे येथे स्व. केशर काकु खासदार असताना तहसीलदार, बीड यांच्या मार्फत मागासवर्गीय बहुजन समाजातील महार, मांग, मांगारूडी, वडार,



मराठा, मुस्लिम, इतर जातीच्या गोरगरीब जनतेला जागा वाटप करून देण्यात आलेली आहे. तेंव्हा पासून आम्ही तिथे घरे बांधून राहत आहोत, त्या जागेचा मालकी हक्क देवून मालकीचे पी.टी.आर. व ७/१२ देण्यात यावेत. आमची नावे पी.टी.आर. ला नसल्यामुळे आम्ही शासकीय लाभापासून वंचित राहत आहोत. या भागातील रहिवाशांना त्यांच्या हक्काचे पीटीआर देण्याचे आश्वासन दिले व हा प्रश्न तात्काळ मार्गे लावण्याचे ही जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले याप्रसंगी माजी मंत्री धनंजय मुंडे, आमदार विजयराजे पंडित, योगेश क्षीरसागर, व प्रकाश आंबेडकर नगर येथील बहिरवाडी माजी सरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते अशोक वीर यांच्यासह शिवाजी अंकुशे, प्रभू हातागळे, राहुल अंकुशे या भागातील नागरिक शिष्ट मंडळात उपस्थित होते.

## १५ ऑगस्ट 'डिजिटल इंडिया फांऊंडेशन डे' जाहिर करा

### खा.बजरंग सोनवणे यांची पंतप्रधान मोंदींकडे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

भारताच्या इंटरनेट युगाला ३० वर्षे पूर्ण झाले असून १५ ऑगस्ट हा 'डिजिटल इंडिया फाउंडेशन डे' जाहीर करण्याची मागणी खा.बजरंग सोनवणे यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी व संचारमंत्री ज्योतिरादित्य राजे शिंदे यांच्याकडे केली आहे. बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी पत्रात म्हटले आहे की, भारतामध्ये सार्वजनिक इंटरनेटसेवा सुरू होऊन यंदा ३० वर्षे पूर्ण होत आहेत.१५ ऑगस्ट १९९५ रोजी विदेश संचार निगम लिमिटेड मार्फत सार्वजनिक इंटरनेटचा शुभारंभ झाला होता.या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय संचार मंत्री यांना पत्र लिहून १५ ऑगस्ट २०२५ हा दिवस 'डिजिटल इंडिया फाउंडेशन डे' म्हणून साजरा करण्याची मागणी केली आहे.सन १९८६ साली सुरु झालेली भारताची डिजिटल क्रांती ही केवळ व्यापारापुरती मर्यादित नव्हती,तर ती शिक्षण,संशोधन व आत्मनिर्भर भारताच्या दिशेने टाकलेले एक दूरदृष्टीपूर्ण पाऊल होते. त्यांनी आपल्या पत्रात भारताच्या इंटरनेट प्रवासातील काही महत्त्वाचे टप्पे अधोरेखित केले आहेत १९८६ शिक्षण व संशोधन संस्थांसाठी इंटरनेट सेवा,१९८७ जिल्हास्तरावर शासन व नियोजन संस्थांना कनेक्टव्हिटि,१९९५ सार्वजनिक इंटरनेट सेवा सुरू,१९९८ खासगी इंटरनेट कंपन्यांसाठी दरवाजे खुले,२००५ ई-कॉमर्स, टेलिमेडिसिन, ऑनलाईन शिक्षणा साठी गती, २०१६ स्वस्त मोबाइल डेटा, युपीआय आधार या प्रणालींची निर्मिती, २०२५ तंत्रज्ञानात जागतिक नेतृत्वाची दिशा देण्याचे काम झाले आहे.आज भारताचा तरुण आयटी निर्यात,स्टार्टअप्सआणि डिजिटली करणाच्या बाबतीत तो जागतिक नेतृत्वाकडे वाटचाल करत आहे.डिजिटल वाटचाल बाजारपेठेच्या उद्देशाने नव्हे तर सार्वजनिक हित लक्षात घेऊन सुरू झाली होती, आणि आज ती भारताला तंत्रज्ञानाच्या आघाडीवर घेऊन गेली आहे असेही म्हटले आहे.



**खा.सोनवणेंच्या महत्वाच्या मागण्या**

**१५ ऑगस्ट २०२५ ला 'डिजिटल इंडिया फाउंडेशन डे' म्हणून मान्यता द्यावी. इंटरनेट,एनआयसी या संस्थांचे योगदान औपचारिकपणे गौरवावे. 'राष्ट्रीय डिजिटल संग्रहालय' स्थापन करून भारताच्या इंटरनेट प्रवासाचे दस्तऐवजीकरण करावे.**

## एक पडदा सिनेमागृहाबाबत संयुक्त समिती करा–आशिष शेलार यांचे निर्देश

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठी चित्रपटांना जास्तीत जास्त चित्रपटगृहे उपलब्ध व्हावीत म्हणून एक पडदा चित्रपटगृहांच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी संबंधित खात्यांची संयुक्त समिती गठीत करण्यात यावी, असे निर्देश सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी आज दिले.महाराष्ट्रातील एक पडदा चित्रपटगृह यांची अवस्था दयनिय असून या चित्रपटगृहाबाबत सरकारने तातडीने उपाययोजना कराव्यात, अथवा अनुदान द्यावे अथवा अन्य मदत करावी या मागणीसाठी विविध संस्था आणि चित्रपटगृह मालक, चालक संघटनेना, कलावंत, चित्रपट निर्माते यांनी सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांना विविध निवेदन दिली होती. त्याबाबत आज मंत्री ॲड आशिष शेलार यांनी सांस्कृतिक कार्य विभाग, गोरेगाव फिल्म सिटी आणि संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीला चित्रपट गृह मालक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी त्यांनी सांगितले की, नगरविकास, गृह, महसूल,. वित्त आणि सांस्कृतिक कार्य विभाग व या क्षेत्रातील तज्ञ यांची संयुक्त समिती गठीत करुन याबाबत सविस्तर अभ्यास करण्यात यावा व त्याचा अहवाल दोन महिन्यात सादर करण्यात यावा तसेच जी ३०० चित्रपट गृहे सुरु आहेत तसेच जी बंद आहेत अशा सर्व एक पडदा चित्रपट गृहांमध्ये मराठी सिनेमा



दाखवण्यात येणार असेल तर त्यासाठी काही शासन प्रोत्साहन योजना आणू शकते का? याचा ही विचार या समितीने करावा, अशा सूचना ही मंत्री शेलार यांनी दिल्या. दरम्यान, गोरेगाव मुंबई येथे प्रस्तावित असलेल्या नाट्यगृहाच्या विषयावर ही बैठक घेण्यात आली. अभिनेते सुनील बर्वे आणि गोरेगावचे नागरिक या नाट्यगृहांसाठी आग्रही असून यासाठी स्वाक्षरी मोहीम ही राबविण्यात आली होती. या प्रश्नावर महापालिका अधिकारी आणि संबधीत कलावंत व स्थानिक आमदार विद्या ठाकूर यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन मंत्री शेलार यांनी आढावा घेतला. उपलब्ध जागा तसेच प्रस्तावित इमारतीबाबत कलावंताचे म्हणणे या सगळ्याचा विचार करुन येत्या पंधरा दिवसात संपूर्ण अहवाल सादर करा व लवकरात लवकर कामाला सुरुवात होईल या दृष्टीने कार्यवाही करा, असे निर्देश मंत्री शेलार यांनी दिले. तसेच आज लावणी कलावंताच्या प्रश्नाबाबत ही बैठक घेऊन त्यांच्या समस्या मंत्री शेलार यांनी समजून घेतल्या.

## मतदान नाही तर राहुल गांधींच्या डोक्यातील चीप चोरीला गेली–मुख्यमंत्री फडणवीस


**मुंबई (वृत्तसंस्था)–** महाराष्ट्रात आणि देशात कुठेही मतदानाची चोरी झालेली नाही. तर राहुल गांधी यांच्या डोक्यातील चीप चोरीला गेली असल्याचा पलटवार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. राहुल गांधी प्रत्येक वेळी खोटे बोलून पळून जात असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. वास्तविक आगामी काळातील निवडणुकीत त्यांना पराजय दिसत आहे. त्यामुळे आधीच कव्हर फायरिंग साठी ते असे आरोप करत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.महाराष्ट्राचे निकाल पाहिल्यानंतर निवडणूक चोरीला गेल्याचा आमचा संशय निश्चित झाला असल्याचा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला आहे. मशीन रीडेबल मतदार यादी न देऊन, निवडणूक आयोगाने भाजपशी संगनमत करून महाराष्ट्र निवडणूक चोरली आहे याची आम्हाला खात्री पटली असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले आहे.या संदर्भात ृत्तसंस्थेशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राहुल गांधी सतत खोटी वक्तव्य करतात आणि खोटे बोलून पळून जातात. राहुल गांधी यांना माहिती आहे की, त्यांची जमीन संपलेली आहे.

## संपादकीय

# ‘नेट’मधील गुन्हेगार


प्राचीन भारतातील ज्ञानकेंद्र असलेल्या नालंदा विद्यापीठाचा ऐतिहासिक वारसा नव्या स्वरूपात आणणाऱ्या प्रकल्पाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते एकीकडे होत असताना, दुसरीकडे विद्यापीठांतील शिक्षकांसाठी अर्हता असलेली राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट) रद्द करण्याचा निर्णय होणे, हा एक विचित्र योगायोग म्हणावा लागेल. मात्र, या योगायोगाने आपल्या शिक्षण क्षेत्रातील वाढती गुन्हेगारी प्रवृत्ती अधोरेखित केली आहे. आधीपासूनच भ्रष्टाचाराने पोखरलेल्या या क्षेत्रात भ्रष्ट आणि गुन्हेगारी प्रवृत्ती आता बळावू लागल्या आहेत.प्रवेश परीक्षा घेण्यासाठी ‘एनटीए’ ही एकच केंद्रीय यंत्रणा निर्माण झाली असली किंवा सार्वजनिक परीक्षांतील गैरप्रकार रोखण्यासाठी स्वतंत्र कायदा केला असला, तरी या प्रवृत्तींना वेसण घालता आलेली नाही. या अपयशाची कबुली सरकारने आता द्यायला हवी. त्याचबरोबर गैरप्रकारांच्या आरोपांमागे राजकारण असल्याचा दावा करून शहामृगी पवित्रा घेणेही बंद व्हायला हवे. विद्यार्थ्यांना सक्षम आणि गुणवान करण्यासाठी असलेल्या आपल्या शिक्षण यंत्रणा याच मुळात अकार्यक्षम आणि गुणवत्ताशून्य आहेत, हेही मान्य करायला हवे. निव्वळ नफा कमाविण्याच्या हेतूने शिक्षणात आलेल्या धनदांडग्यांनी यंत्रणांतील लाचखोर अधिकारी आणि भ्रष्ट शिक्षकांना हाताशी धरून पेपर फोडण्यापासून निकालांत फेरफार करण्यापर्यंत अनेक प्रकारची गुन्हेगारी कृत्ये करण्याच्या घटना आता नित्याच्या झाल्या आहेत. पेपरफुटीपासून गैरव्यवहारांपर्यंतच्या आरोपांमुळे सध्या वादाच्या केंद्रस्थानी असलेली ‘नीट’ ही वैद्यकीय प्रवेश परीक्षा आणि बुधवारी रद्द झालेली ‘नेट’ परीक्षा ही याची ताजी उदाहरणे. परीक्षा रद्द करण्याबरोबरच या प्रकरणांच्या मुळाशी जाऊन दोषींना कठोर शिक्षा करणे आणि नवीन निर्दोष व पारदर्शक परीक्षा पद्धत विकसित करणे, हाच यावरील उपाय आहे.देशभरातून नऊ लाखांहून अधिक उमेदवारांनी दिलेली ‘नेट’ परीक्षा रद्द होण्यामागचे कारण धक्कादायक आहे. मंगळवारी झालेल्या या परीक्षेतील सायबर गुन्ह्यांची दखल केंद्रीय गृह मंत्रालयाच्या अखत्यारित असलेल्या राष्ट्रीय सायबर गुन्हे विश्लेषण शाखेने घेतली आहे. उच्च शिक्षण व्यवस्थेत शिक्षक होण्यासाठी आणि पीएचडी संशोधनास पात्र ठरण्यासाठी असलेल्या या परीक्षेत होत असलेली गुन्हेगारी या क्षेत्रातील हितसंबंधीयांच्या साखळीकडे अंगुलिनिर्देश करणारी आहे. ‘नीट’प्रमाणे ‘नेट’ परीक्षाही ‘एनटीए’कडून घेतली जाते. कोणत्याही प्रकारच्या गैरप्रकाराला वाव न देणारी पारदर्शक परीक्षा पद्धत विकसित करण्यात ‘एनटीए’ अपयशी ठरल्याचे या दोन्ही परीक्षांवरून स्पष्ट होते. या अपयशाची जबाबदारी ना ‘एनटीए’ घेत आहे, ना केंद्रीय शिक्षण मंत्रालय. ‘नीट’चा निकाल जाहीर झाल्यानंतरच त्यामधील गुणफुगवट्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या गेल्या. पाठोपाठ गैरप्रकारांचे आरोप सुरू झाले. पेपरफुटीचाही आरोप झाला. केंद्रीय शिक्षण खात्याची पुन्हा एकदा धुरा सांभाळणारे मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तर सुरुवातीला गैरप्रकारांचा इन्कार केला. मात्र, त्याचे पुरावे समोर येऊ लागल्यानंतर काही ठिकाणी असे प्रकार झाल्याची कबुली दिली. प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेल्यानंतर ‘एनटीए’ने वाढीव गुण रद्द करणार असल्याचे जाहीर केले. मात्र, तोपर्यंत यंदाच्या ‘नीट’ची विश्वासार्हता जवळ जवळ संपुष्टात आली होती. ती रद्द केली जावी, यासाठीचा दबाव मात्र वाढत गेला. ‘नीट’चा हा अनुभव लक्षात घेऊन ‘नेट’बाबत गुन्ह्याची कल्पना आल्यानंतर ती रद्द करण्याचा निर्णय झाला, ते योग्यच म्हणावे लागेल. हाच कित्ता ‘नीट’बाबत आता गिरवायला हवा.‘नीट’, ‘नेट’ यांसह अन्य परीक्षा देणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणे हा सर्वांत मोठा गुन्हा आहे. या विद्यार्थ्यांचा या परीक्षांवरील विश्वास उडणे शिक्षण क्षेत्रासाठी चांगले नाही. पेपरफुटीमागे संबंधित परीक्षकांपासून विद्यार्थ्यांच्या हातात प्रश्नपत्रिका पडेपर्यंतच्या साखळीतील अनेक जण असू शकतात. लाखो रुपये शुल्क आकारणाऱ्या खासगी कोचिंग क्लासचालकांचेही हितसंबंध यांमध्ये असतात. यंत्रणेतील कच्च्या दुव्यांपासून क्लासचालकांपर्यंत; तसेच राजकीय नेत्यांपासून यंत्रणेत गेलेल्या माणसांपर्यंत प्रत्येक घटकाचा कसून तपास करायला हवा आणि दोषींना कठोर शिक्षा व्हायला हवी. याच्याच जोडीने परीक्षा निर्दोष होईल, यासाठी पावले उचलायला हवीत. या बहुतेक परीक्षांत वस्तुनिष्ठ प्रश्न विचारले जातात. अशा प्रकारच्या प्रश्नांतून विद्यार्थ्यांचे आकलन पूर्णपणे तपासता येते का, याचा फेरविचार व्हायला हवा. या स्वरूपामुळे पेपरफुटीचा प्रकार वाढतोय का, हेही पाहायला हवे. वर्षातून एक-दोनदाच परीक्षा घेण्याच्या ऐवजी वर्षभरात पाच-सहा वेळा परीक्षा घेण्याचे नियोजनही करायला हवे. देशाला प्रमुख ज्ञानकेंद्र बनविण्याचा उच्चार पंतप्रधानांनी नालंदा येथे केला आहे. ज्ञानाचे केंद्र होण्याची वाट निर्दोष आणि पारदर्शक परीक्षा यंत्रणेतून जाते, हे विसरून चालणार नाही.

# देवस्थानांचे आजचे स्वरूप



अलीकडे मोठमोठ्या देवस्थानांच्या ठिकाणी दोन-तीन गट स्थापन झालेले दिसतात. त्यांच्यामध्ये जोरदार वाद सुरू आहेत. प्रत्येक गट स्वतःचे अस्तित्व महान दाखवण्याचा प्रयत्न करताना दिसत आहे. एकाच देवस्थानाच्या या गटांनी देवाचे नाव तेच ठेवून आपल्या गटाचे नाव थोडे बदलल्याचे दिसते. प्रत्येकाने स्वतंत्र पावती पुस्तके छापली आहेत आणि भक्तांकडून वर्गणी गोळा करून प्रत्येकजण आपापल्या पद्धतीने अन्नदान व इतर सामाजिक उपक्रम करताना दिसत आहेत. हे गट एकमेकांवर आरोप करतात, एकमेकांकडे वाईट नजरेने बघत सूडबुद्धी जागवत आहेत. त्यांनी कोणीतरी राजकीय नेता हाताशी धरला आहे. हे गट मंदिराच्या आसपासच्या जागेत अतिक्रमण करून आपले बस्तान बसवण्याच्या प्रयत्न करताना दिसतात. देवादिकाच्या नावावर इतरांच्या जागेवर अतिक्रमण केल्यानंतर तेथे देवाची मूर्ती बसवून रातोरात दुसरे देऊळ तयार करून श्रद्धा व भावनेचा प्रश्न निर्माण केला जातो. आजूबाजूच्या लोकांवर दबाव आणून त्यांना विनाकारण त्रास दिला जातो. यात बऱ्याच जणांचा वैयक्तिक स्वार्थही असतो.तीर्थक्षेत्र म्हणजे, जेथे शांतीचा प्रत्यय येतो, ज्या ठिकाणी लोकांना शांती मिळते, लोकांची मने सबल व निर्मल होतात, लोकांच्या भावनांना जेथे महत्त्व दिले जाते, तेथे द्वेष बुद्धीला, क्रोधाला, अहंकाराला अजिबात स्थान दिले जात नाही, असे क्षेत्र. परंतु ही देवस्थाने चालवणाऱ्या मंडळींमध्ये प्रचंड अस्वस्थता, आपापसात भेदभाव, एकमेकांविषयी द्वेष, दुसऱ्या गटातील लोकांना नेस्तनाबूत करण्याची इच्छा दिसते. एकमेकांवर दाखल केलेले दावे, त्यामुळे होत असलेले राजकारण, याचा आजूबाजूच्या लोकांना होत असलेला त्रास याला अध्यात्म म्हणता येणार नाही. बऱ्याचशा ठिकाणी पहाटेच सुरू होणाऱ्या धार्मिक कार्यक्रमांसाठी लावलेल्या ध्वनिवर्धकाचा आवाज लांबवर जातो. त्यामुळे मुलांच्या अभ्यासात व लोकांच्या निद्रेत अडथळा येतो. सर्वसामान्य नागरिक त्रासून जातात.ज्यांच्याकडे पैसे आहेत, त्यांना विशेष दर्शन मिळते. सर्वसामान्य माणसांना ढकलून बाहेर काढले जाते. देवाच्या दारात देवाच्या लेकरांना समान वागणूक मिळत नसेल तर ते अध्यात्म आहे का? याचा आज विचार करण्याची गरज आहे. माणसाने माणसाशी माणसासम वागणे, हेच खरे अध्यात्म. आपल्या वागणुकीमुळे, कृतीमुळे, कोणालाही त्रास होणार नाही, आपल्या मनात इतरांविषयी सदैव करुणा व मैत्रीचाच भाव असेल, लोककल्याणाच्या भावनेचा उदय होईल, अशी आपल्या मनाची जडणघडण करणे, हा खरा अध्यात्माचा अर्थ आहे. देवस्थानांनी यावर विचार केला तरच तीर्थक्षेत्रे खऱ्या अर्थाने धर्म आणि अध्यात्माची केंद्रे होतील.


# संगीताचे मेंदूविज्ञान



माणसाचे माणूसपण कशात? या सवालाचा जबाब देताना विज्ञान काही गुणविशेष सांगते, त्यातील एक महत्त्वाचा गुणविशेष म्हणजे ‘संगीत’! पाखरे गातात, देवमासे, डॉल्फिन्स हे सुद्धा गुणगुणतात. उत्क्रांतीचा विचारपुरुष डार्विनने सांगितले आहे त्याचा आशय असा, ‘नर वानर गणातील प्राणी ‘मादी आणि नर’ एकमेकाला आकर्षून घेण्याकरता समागमाच्या काळात सांगीतिक-स्वर आणि ताल वापरतात.’ माणूस यापेक्षा खूप निराळा आहे तो ‘कंठ संगीत’ तसेच ‘वाद्य संगीत’ निर्मितो. प्राणी जगतात हे कोणी करताना दिसत नाही. मानवी संगीतात ‘तानसेन’ असतात, तसे ‘कानसेनही’ असतात. माणूस एकट्याने संगीत एन्जॉय करतो आणि समूहानेही जीवाचा कान करून ऐकतो. पाश्चात्य देशातील लाईव्ह कॉन्सर्ट्समध्ये लाखांची तरुणाई उभे राहून बेभान होऊन ऐकत असते. तत्त्वज्ञ निश्ते म्हणाला होता, ‘आपण संगीत आपल्या स्नायूंनी ऐकतो.’प्रत्येक कलेची भाषा असते. मेंदूविज्ञानाने यावर संशोधनाने प्रकाश टाकला आहे. दृश्यकलेची भाषा चित्र आणि शिल्प, कथनकलेची भाषा शब्द, संगीताची भाषा स्वर, लय, ताल. संगीताचे मुख्य माध्यम ध्वनी, ‘सॉनिक मीडियम’. यात दृष्टी संवेदनाचा भाग असतो, असे नूतन शोधात मेंदूविज्ञानाला आढळून आले आहे. माणूस सुखदु:खात, आनंदात, धार्मिक प्रसंगात आणि अगदी युद्धातसुद्धा संगीताचा उल्हासाने उपयोग करतो. कोणत्याही कलेत दोन घटक असतात. कला निर्माण करणारा ‘निर्मिक’ आणि कलेचा आस्वाद घेणारा ‘आस्वादक’. संगीताचा या दोघांच्या मेंदूवर परिणाम होत असतो आणि पर्यायाने त्यांच्या वर्तनावर सुद्धा परिणाम होत असतो. या दोहोंचा मेंदूविज्ञानाने शोध-वेध घेऊन बोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

वाणीचे केंद्र म्हणजे ध्वनी निर्माण करण्याचे केंद्र आणि त्या आवाजाचा अर्थ लावण्याचे केंद्र, मेंदूतील या दोन्ही केंद्रांचा शोध ब्रोका आणि वर्नीके या दोन मेंदूतज्ज्ञांनी दोन शतकांपूर्वी लावला होता. ही दोन्ही केंद्रे मेंदूच्या डाव्या गोलार्धात असतात, हे सुद्धा समजले होते. संगीतातील स्वर, ताल, लय, ध्वनीची गती हे अमूर्त ध्वनी असतात. त्याचे मेंदूत संवेदन कोठे होते, याचा शोध आधुनिक संशोधनाने घेतला आहे.१९०५ सालची घटना. बॉन्वीसिनी या युरोपियन मेंदूतज्ज्ञाकडे मेंदूला इजा झालेला एक पेशंट आला होता. त्याला सगळ्या वाद्यांचे ध्वनी ओळखता येत होते, तो चुकीचे स्वरही ओळखत असे, पण त्याला राष्ट्रगीताचे शब्द कळत नसत. वाद्यांचे ध्वनी ओळखण्याची मेंदूतील प्रक्रिया आणि केंद्रे आणि शब्द ओळखण्याची प्रक्रिया भिन्न असल्या पाहिजेत, असे त्या मेंदूतज्ज्ञाने ताडले. मेंदूच्या विकृतीच्या शोधातून मेंदूसंशोधनाला योग्य दिशा मिळाली. असे मेंदूविज्ञानाच्या इतिहासात अनेकदा घडले आहे. आताही असेच घडले.तीन दशकांपूर्वी मेंदूसंशोधनाची विविध तंत्रे उपलब्ध झाली. त्याचा उपयोग करून मारसेलेस (चर्रीशळश्रश्रशी) आणि मॉंट्रीयल (ेर्पीीशरश्र) या दोन विद्यापीठांत संगीत संवेदनावर मेंदूसंशोधन झाले. वाणीचा ध्वनी ओळखण्याची मेंदूतील प्रक्रिया आणि संगीतसंवेदनावरची प्रक्रिया या विभिन्न असतात. वाणीचा आवाज डाव्या गोलार्धात ओळखला जातो, तर संगीतध्वनी ओळखण्यात दोन्ही गोलार्ध काम करतात, पण उजव्या गोलार्धाचे योगदान जास्त असते. याचा सखोल अर्थ समजून घेतला पाहिजे. संगीतध्वनी निर्माण करणारा उजवा गोलार्ध वापरतो आणि संगीत ऐकणारा सुद्धा संगीतध्वनीचा अर्थ लावताना उजवा गोलार्धही वापरतो. मेंदू हा चतुर अवयव आहे, तो कमीतकमी सामुग्री वापरून आणि कमी ऊर्जा वापरून काम करत असतो. या संशोधनात आणखी एक गोष्ट उघड झाली. ध्वनी स्वरमानात बदल झाला तेव्हा काही दृष्टिकेंद्रे उजळून निघाली, म्हणजे उद्दिपित झाली.संगीतामुळे वर सांगितलेली कॉर्टेक्समधील केंद्रे उद्दिपित होतात आणि तेथून निघणारे संदेश थेट ‘लिम्बिक सिस्टिम’ म्हणजे, भावनेच्या आदिम भागापर्यंत जातात आणि त्यांना उद्दिपित करतात. यासाठी अमेरिकेतील ओहायो विद्यापीठाने एक सर्वेक्षण केले तेव्हा ७० टक्के लोकांनी ‘संगीतामुळे आमच्या भावना उद्दिपित होतात,’ असे सांगितले. सुसंवादी आणि विसंवादी मेलडीमुळे भावनिक केंद्रातील वेगळे भाग उद्दिपित होतात, असे स्कॅनिंगमध्ये आढळून आले. त्यामुळे काही संगीतामुळे दु:खद, तर काहींमुळे सुखद भावना निर्माण होतात, याला मेंदूविज्ञानाने आधार दिला आहे. हासू आणि आंसू संगीत निर्माण करू शकते.माझा एक कानसेन मित्र आहे. तो संगीताच्या लाईव्ह-सचेतन कार्यक्रमाला नेहमी हजेरी लावतो. मला प्रश्न पडला होता, असे का? झुरिक आणि ओस्लो विद्यापीठाने त्याचे उत्तर दिले. एका खोलीत पियानो वादक वाजवत होता आणि ते ऐकणाऱ्या माणसाच्या मेंदूचे स्कॅनिंग केले. त्याच्या मेंदूतील ॲमिगडला हे महत्त्वाचे केंद्र आणि इतर भावनेची केंद्रे उजळून निघालेली दिसली. काही दिवसांनी तेच संगीत ध्वनिमुद्रित करून त्याला ऐकवले आणि स्कॅनिंग केले तर काय आश्चर्य, त्याच्या मेंदूतील भावनेची केंद्रे अगदी कमी प्रमाणात उद्दिपित झालेली दिसली. आता मला कारण कळले. श्रोते कसा प्रतिसाद देतात त्यानुसार गायकाचे, वादकाचे संगीत त्याला जुळवून घेते, हे सुद्धा मेंदूविज्ञानाने सिद्ध केले आहे.सेरिबेलम म्हणजे छोटा मेंदू हा संगीतासाठी आणि संगीतातील वाद्यवादनाकरिता अत्यंत महत्त्वाचा असतो. हा नसेल तर संगीत उभेच राहू शकत नाही. आपण पेटीवर फिरणारी बोटे, तबलजीचे हात पाहून चकित होतो. याला कारण छोटा मेंदू. मोटर कॉर्टेक्समुळे स्नायूंच्या हालचाली होतात, पण सरावामुळे त्या हालचाली उत्तम आणि सहज होण्यासाठी छोटा मेंदू लागतो. सरावामुळे छोटा मेंदू या हालचाली तुमच्याही नकळत सुधारतो. या हालचालींच्या स्मृती छोट्या मेंदूत साठवून ठेवल्या जातात. रियाज, सराव यामागे हे मेंदूविज्ञान आहे.कानाच्या आतल्या भागात ३५०० हेअर सेल्स असतात. या एक प्रकारच्या न्यूरॉन्स असतात. कानाच्या पडद्यावर आदळणाऱ्या ध्वनिलहरी या केशपेशी जणू झेलून घेतात आणि संदेश ऑडिटरी नर्व्हद्वारे मेंदूकडे पाठवतात. पुढे काय घडते, ते वर सांगितले आहे. या न्यूरॉन्स अतिशय नाजुक असतात. हाय डेसिबल्समुळे त्यांचे नुकसान होते. यामुळे उत्तम संगीत ऐकण्याची माणसाची क्षमता नाश पावते.माणसाचे कोणतेही वर्तन उगाच उत्क्रांत होत नाही. त्याला जीवनसंघर्षात तगून राहण्याचे मूल्य असते. नॅशनल जीऑग्राफिकने ६० हजार वर्षांपूर्वीची बासरी शोधून काढली आहे. गिधाडाच्या हाडापासून बनवलेली ही बासरी जगातील सर्वात प्राचीन वाद्य म्हणून ओळखली जाते. मन रिझवण्यासाठी, एकमेकांशी संपर्क साधण्याकरता, अशा विविध कारणांसाठी संगीत उत्क्रांत झाले असेल. संगीत या संस्कृत शब्दाच्या व्याख्येत नृत्य, गीत, वाद्यवादन या सगळ्यांचा समावेश होतो, याचे कारण उत्क्रांतीत दडले असावे.

# लिहिता लिहिता...



मनातल्या विचारांचे, भावभावनांचे, शब्दात रूपांतर करणे आणि त्यातून एखादी कविता, चारोळी, ललित लेख, विनोदी लेख, लघुकथेच्या रूपात प्रकट होणे, ही एक प्रकारची साहित्यिक उर्मीच म्हणावी लागेल. अचानक काहीतरी मनात येतं. मग ते लेखणीतून साकारल्याशिवाय स्वस्थ बसवत नाही. तशीच काहीशी अवस्था माझीही होते. मनातल्या भावभावनेला, गुंतागुंतीला, अस्वस्थतेला कुठेतरी वाट करुन द्यावी, म्हणून लेखणी हातात धरली. लिखाणशैली चांगली असल्याने आणि डोक्यात वेगवेगळे विचार येत असल्याने ते कागदावर उतरवत राहिलो.सुरवातीला माहिती नव्हतं की, मी लिहितोय ते कितपत चांगलं आहे, वाचनीय आहे, पण आप्तस्वकीयांच्या बोलण्यातून, छान लिहितोस, असंच लिहीत रहा, असे प्रोत्साहनरूपी टॉनिक मिळाल्यावर हुरूप वाढला. खरे तर सुरुवात झाली ती लोकलच्या तास-दीड तासाच्या प्रवासात. सर्व प्रवासी मोबाइलमध्ये माना खुपसून सतत काहीतरी पहात असतात, हे नेहमी पाहायचो. मला प्रश्न पडायचा की, एवढ्या माना टाकून हे मोबाइलभक्त काय बरं बघत असावेत! मग तिथेच मोबाइलवर एक कविता सुचली आणि ताबडतोब लिहून काढली. सगळ्यांना ती खूप आवडली, पण ‘ही नक्की तूच लिहिलीस का? तू कधीपासून एवढा लिहायला लागलास?’ वगैरे विचारणा झाली. अर्थात त्यात त्यांचा काही दोष नव्हता, म्हणजे शाळा-कॉलेजांत लिखाण चांगलं होतं, पण ते निबंधांपुरतचं मर्यादित असायचं, कुठलीही गोष्ट ठरवून होत नसते, तर ती आपसूक घडते. तुमच्या अंगात एखादी कला असेल, तर ती कधीतरी उफाळून बाहेर येते, फक्त ती वेळ यावी लागते.माझेही तसेच झाले. मनातल्या विचारांना, शब्दांना वाटा फुटत होत्या. त्याला वेळ, काळ, प्रसंगाचं भान नव्हतं, म्हणजे ऑफिसमध्ये साहेब एखाद्या गंभीर विषयावर चर्चा करत असेल तर नेमकी त्याच वेळी आपल्याला विनोदी कविता सुचावी असंही होत असे. बऱ्याचदा सुचलेलं काही कुठेतरी व्यग्र असल्यामुळे कागदावर उतरवता यायचे नाही, आणि मग कालांतराने ते विस्मृतीतही जायचं. पुन्हा कधीतरी ते विचार मनातून कागदावर उमटायचे, मनातलं कागदावर उमटणं आणि ते लोकांपर्यंत पोहोचून त्यांची पावती मिळणं, ही प्रक्रियाच किती आनंददायी, मनाला सुखावणारी आहे. त्याच मोल शब्दांत वर्णन करणं केवळ अशक्य! तेव्हापासून लिहिण्याचा सिलसिला सुरू झाला तो आजतागायत. कधी कविता, तर कधी ललितलेख, कधी लघुकथा, कधी विडंबन, तर कधी विनोदी लेख... कधी काय सुचेल याचा नेम नाही. बरं, असं ठरवून काहीच होत नव्हतं. आजूबाजूच्या व्यक्ती, प्रसंग, संदर्भांमधून ते स्फुरत होतं. जसं जेवणामध्ये पोळी, भात, भाजी, आमटी, चटणी, कोशिंबीर असं सगळं साग्रसंगीत असेल तर जिव्हा तृप्त होते, तसंच साहित्यथाळीत कविता, ललितलेख, लघुकथा, विडंबन, चारोळी, विनोदी लेख इ. असल्यावर मला तृप्ततेची अनुभूती होते. साहित्यप्रवासाला अनेक वाटा फुटल्या. एम.ए (मराठी) करताना मा. दिनानाथ मंगेशकरांवर प्रकल्प अभ्यास, घरात दर महिन्याला चालणाऱ्या ‘वाचनकट्टा’ या उपक्रमासाठी सोशल मीडियावर लिहिलेलं विनोदी प्रहसन, मधुबालाच्या जीवनावर लेखन व सादरीकरण, कार्यालयातील दिपावली स्मरणिकेसाठी लेखन व संपादन सहाय्य, गणेशोत्सवाच्या चलचित्रासाठी विषय, संहिता व संवाद लेखन, ‘महाराष्ट्र टाइम्स’च्या पुरवणीत विविध सदरांत लेखन असे विविध प्रकारचे लेखन सर्वांना आवडल्याची पोचपावती मिळाली. साहित्यप्रकारातले मधुकण वेचताना सुखाची, आनंदाची अनुभूती दिवसेंदिवस मनाला आनंद देऊन जात होती. शब्द हे शस्त्रासारखे असतात, असं म्हणतात, पण ते किती व कसे वापरावे, याचं शास्त्र मला लेखनकलेने शिकवलं. शब्दांचं मोल हे विचारांच्या तराजूत तोललं तर ते नक्कीच आपल्याला न्याय देतात. माझ्या साहित्य प्रवासात अनेक जण जोडले गेले, नामवंत लेखकांना भेटण्याचे, त्यांच्याशी बातचीत करण्याचे भाग्य लाभले. मी स्वत: याचा आनंद घेत होतो व इतरांनाही देत होतो. या आनंदयात्रेची सफर कधीच संपू नये, असंच सतत वाटत राहातं.

# विकासाच्या नावाने आमच्या समृद्ध संस्कृतीला पोहोचते ठेच

## विश्व आदिवासी दिन : मोलगी येथील कार्यक्रमात उमटला सूर

**मोलगी | रविंद्र वळवी**

नैसर्गिक खाद्यसंस्कृती, राहणीमान, रितीरिवाज, परंपरा, पेहराव व वाद्ये यातून समृद्ध तथा आदर्श ठरलेली आदिवासी संस्कृती आज भोगवाद, प्रस्थापित व भांडवलशाहीमुळे धोक्यात आली. मानवी मुल्यांनी गर्भश्रीमंत असलेल्या या संस्कृतीला ठेच पोहोचली. शिवाय प्रकृती पूजत धरती वाचवण्याची आदिवासींनी ठेवलेली ताकदही कमी करण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात आहे, असा सूर आदिवासी गौरव दिनानिमित्त मोलगीत झालेल्या कार्यक्रमात उमटला.

सातपुड्याच्या चौथ्या रांगेतील सांस्कृतिक राजधानी मोलगी येथे आदिवासी एकता परिषदेमार्फत विश्व आदिवासी दिवस साजरा झाला. वाद्य ढोल, पिरी, पावी या वाद्यांच्या सूर-तालावर बिरसा मुंडा चौकापासून सांस्कृतिक रॅली काढली. रॅलीत आदिवासी सोंगाड्या पार्टी किसन ण्ड नामू यांच्या रोडाली, सांस्कृतिक गीते सर्वांचे आकर्षण ठरले. सोंगाड्या नामू वळवी, किसन गावीत, राधा या सहकलाकारांनी आपल्या कलेतून आदिवासी क्रांतिकारकांची जाणीव करुन दिली.मुख्य कार्यक्रमात अध्यक्षस्थानी मधुकर वसावे होते. तर माजी पोलीस पाटील रतनसिंग वसावे, माजी जि.प.सदस्य सी.के.पाडवी, किरसिंग वसावे, सीताराम राऊत, निर्मला राऊत, करमसिंग पाडवी, प्रमोद वसावे,ड.सरदार वसावे, रामा तडवी, बाज्या वळवी, बाप पार्टीचे पदाधिकारी वाड्या वळवी, खेमसिंग वळवी, धावपटू तथा उपजिल्हाधिकारी किसन तडवी, रामसिंग वळवी, राजस्थानमधून रवींद्र बरझड आझाद, रुपलाल परमार, कन्हैयालाल खराडी, जयसिंह झोडिया, अरविंद शर्मा, ब्रिजलाल पाडवी, राकेश पाडवी आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान ड.सरदार वसावे यांनी दाही दिशेने भरकटलेल्या आदिवासी बांधवांच्या भूमिकेबाबत चिंता व्यक्त केली. किसन तडवी यांनी प्रत्येक आदिवासी पालकांनी मुलांना खेळांमध्ये सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे आवाहन केले. किरसिंग वसावे यांनी विकासाची आवश्यक ठराव करण्याचे आवाहन केले. याशिवाय निर्मला राऊत, प्रदीप तडवी, सरपंच दिलीप वसावे, रामसिंग वळवी, बाज्या वळवी यांनीही मनोगत व्यक्त केले.





**सुख-दुःखाचा संदेश देणारी वाद्ये जपा**

आदिवासी हा निसर्ग नियमांवर चालणारा समाज आहे. यात वाद्ये देखील प्राकृतिकच असून ती सुखासाठी वेगळी तर दुःखासाठी वेगवेगळी वाद्ये आहे. ही वाद्ये वाजवताना सूर-तालानुसार रडायला अन् नाचायलाही लावतात. ही वाद्ये कायम जपावी असे आवाहन सी.के.पाडवी यांनी व्यक्त केली.

**देशात आधी आदिवासी आला की सरकार?**

आदिवासी या देशाचा मूळ मालक असूनही आज त्याला जमिनीपासून बेदखल केले जात आहे. त्यामुळे देशात आधी आदिवासी होता की सरकार असा प्रश्न पडल्याचे मत राजस्थानचे सामाजिक कार्यकर्ते रवींद्र बरझड यांनी व्यक्त केले. शिवाय आदिवासींच्या समस्या सोडवण्यासाठी प्रशासनाने दरमहा आदिवासी संवाद घडवून आणण्याचे आवाहन देखील केले.

**आदिवासी मौखिक इतिहासकारांचा सन्मान सन्मान**

आदिवासी सण-उत्सवात महत्वाची भूमिका बजावणारे मोडवी, पुंजारा या मौखिक इतिहासकारांचा सन्मान करण्यात आला. त्यात किसन पाडवी, रोडत्या पाडवी, खात्र्या तडवी, बाज्या वसावे यांचा समावेश आहे. आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या १८ ढोल वादकांचा देखील सन्मान करण्यात आला.

**कार्यक्रमात केलेले ठराव**

१- आदिवासी संस्कृती, परंपरा, पूजाविधी अबाधित ठेवणे.

२- आदिवासींच्या ताब्यातील जल, जंगल, जमीन व अन्य संपत्तींवरील हक्क कायम ठेवत संपत्ती हडपणाऱ्या प्रवृत्तीला विरोध करणे.

३- आदिवासी क्षेत्रात ५ वी अनुसूची लागू करत ग्राम सभा, पंच मंडळामार्फत अंमलबजावणी करणे

४- आदिवासी क्षेत्रात ग्राम सभेच्या ठरावाशिवाय कुठलाही प्रकल्प होऊ न देणे

५- आदिवासी सण-उत्सवात पारंपारिक वाद्यांच्याच अवलंब करणे.

६- देव आहंट्या (अस्तंबा) ला अश्वत्थामा म्हणून न संबोधणे

७- दिवाहा (दिवाळी) उत्सवातील प्रमुख स्थानक उंगलकुंडीला भिमकुंड म्हणून न संबोधणे

# विद्यार्थिनींनी झाडांना राख्या बांधून दिला पर्यावरण रक्षणाचा संदेश

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**



भारतीय संस्कृतीत महत्वाचा मानला जात असलेला राखी पौर्णीमे चा सण देशात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.या दिवशी बहिणी प्रेमाचे प्रतिक म्हणुन भावांना राख्या बांधतात आणि बहिणीचे रक्षण करावे तसेच त्यांच्या प्रिय भावास दीर्घायुष्य लाभावे,यासाठी देवाकडे प्रार्थना करतात नेमका हाच संदेश वापरून योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित श्रीमती गोदावरीबाई कुंकूलोळ योगेश्वरी कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी निसर्ग संवर्धन मंडळातंर्गत प्राचीन वृक्षांना म्हणजेच मातृवृक्षांना राख्या बांधून वृक्ष आमचे भाऊ असून ते दिर्घायुषी व्हावे व प्रदूषणाच्या दैत्यापासून आमचे रक्षण करावे अशी प्रार्थना केली. वसतीगृहाचे गृहपाल, शिक्षिका यांच्या मार्गदर्शनात हा आगळा वेगळा उपक्रम राबवुन वृक्ष संवर्धनाचा संदेश देण्यात आला.सर्वत्र होणाऱ्या वृक्ष तोडीमुळे निसर्गाचा समतोल बिघडला परिणामी ग्लोबल वार्मिंगचा प्रश्न जागतिक समस्या बनली.यावर उपाय म्हणुन वृक्ष लागवडी सोबतच वृक्षसंवर्धनाची गरज ओळखुन या विद्यार्थीनी राखीपौर्णिमे निमीत्त परिसरातील वृक्षांना वृक्षरक्षा बंधन करण्यात आले.सदर उपक्रम केवळ औपचारिकता म्हणुन न राबविता वेळोवेळी या वृक्षांच्या सुरक्षिततेची खात्री करून व वेळ पडल्यास त्यांच्या सुरक्षिततेसाठी संघर्ष करण्याचा मानस सुद्धा विद्यार्थिनींनी यावेळी व्यक्त केला. रक्षाबंधनासाठी विद्यार्थीनींनी पर्यावरणाला हानीकारक असणाऱ्या घटकांना वगळुन वृक्ष रक्षाबंधन केले.याप्रसंगी निसर्ग संवर्धन मंडळ, योगेश्वरी विद्यार्थी वसतीगृह यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# बोरद ग्रामपंचायतीत विश्व आदिवासी दिवस उत्साहात साजरा

**नंदुरबार | दिपक गोसावी**



येथील बोरद ग्रामपंचायत कार्यालयात आज, ९ ऑगस्ट रोजी, जागतिक आदिवासी दिवस अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. सरपंच अनिता भिलाव यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी ठीक ९ वाजता हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाची सुरुवात आदिवासी समाजाचे आराध्य दैवत देव मोगरा माता, बिरसा मुंडा, खाजा नाईक, धनुर्धारी एकलव्य आणि तंट्या भिल यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. या सर्व महान व्यक्तिमत्त्वांना पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

उपसरपंच संतोष ढोडरे यांनी या दिवशीचे महत्त्व उपस्थितांना सांगितले. ते म्हणाले की, आदिवासी समाजाची समृद्ध संस्कृती, परंपरा आणि अद्वितीय ओळख जपण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. या दिवसाचा मुख्य उद्देश आदिवासी समाजाच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांच्या योगदानाला सन्मान देणे हा आहे.

या कार्यक्रमाला सरपंच अनिता भिलाव, उपसरपंच संतोष ढोडरे, ग्रामपंचायत सदस्य, स्थानिक पत्रकार, विनोद पवार,गुलाब पवार,विक्की पवार,भाऊराव बिरारे,कांतीलाल ठाकरे,शिवदास ठाकरे ग्रामपंचायत कर्मचारी मंगलसिंग राजपूत,बबलू राजपूत,निलेश राजपूत,संजय भिलाव,रवींद्र ठाकरे,पुण्या ठाकरे,रवींद्र गुंजाळे आणि जय आदिवासी युवा शक्ती संघटनेचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्वांनी एकत्रितपणे आदिवासी समाजाच्या गौरवशाली इतिहासाचे स्मरण केले आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# आडस येथे होणार सर्व रोग निदान शिबीर व रक्तदान शिबीर-रमेशराव आडसकर

**केज | प्रतिनिधी**




सत्तरच्या दशकातील केज,अंबाजोगाई तालुक्यातील सहकार, शिक्षण क्षेत्राच्या माध्यमातून विकासाची गंगा खेचुन आणणारे लोकनेते माजी आमदार स्व.बाबुरावजी आडसकर यांच्या कामाच्या माध्यमातून अजुनही शेतकरी, शेतमजूर यांच्या मनात कायम स्मृती आहेत. त्यांचा हाबाडा हा शब्द संपुर्ण महाराष्ट्रात गाजला होता.लोकनेते माजी आमदार स्व. बाबुरावजी आडसकर यांच्या नवव्यापुण्यतिथी निमित्त दि.१२आगष्ट २०२५ मंगळवारी छत्रपती शिवाजी विद्यालय आडस या ठिकाणी सकाळी नऊ वाजता सर्व रोग निदान व रक्तदान शिबीर होणार असुन सकाळी अकरा वाजता ह.भ.प. महंत भगवान महाराज शास्त्री वरपगांवकर यांचे पुण्यतिथी निमित्त किर्तन होणार आहे. अशी माहिती अंबा सहकारी कारखाना, अंबाजोगाईचे चेअरमन रमेशराव आडसकर यांनी दिली आहे.

या सर्व कार्यक्रमांना व महाप्रसादासाठी केज, अंबाजोगाई,धारूर, वडवणी व माजलगाव तालुक्यातील सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन रमेशराव आडसकर व ऋषीकेश आडसकर यांनी केले आहे.

# भावंडांच्या नात्याचा सण ‘रक्षाबंधन’ उत्साहात साजरा

**केज | प्रतिनिधी**



प्रेम,जिव्हाळा आणि संरक्षणाच्या वचनाचा पवित्र सण ‘रक्षाबंधन’ आज राज्यात उत्साहात साजरा करण्यात आला या सणाची मुळे प्राचीन कथांमध्ये आढळतात. महाभारतातील कथा सर्वाधिक प्रसिद्ध आहे. जेव्हा द्रौपदीने श्रीकृष्णाच्या जखमी हाताला आपल्या साडीचा तुकडा फाडून बांधला,तेव्हा कृष्णाने तिला सदैव संरक्षण देण्याची शपथ घेतली. त्याचप्रमाणे, ऐतिहासिक काळात मेवाडची राणी कर्णावतीने गुजरातच्या बादशहा हुमायूँला राखी पाठवून मदतीची विनंती केली होती, आणि हुमायूँने आपले साम्राज्य सोडून तिच्या रक्षणासाठी धाव घेतली होती.

आजही ही परंपरा भावंडांमधील प्रेम, विश्वास आणि रक्षणाचे प्रतीक म्हणून जपली जाते.बहिणीने आपल्या भावाच्या मनगटावर राखी बांधून त्याच्या दीर्घायुष्याची व सुख समृद्धीची प्रार्थना केली, तर भावाने बहिणीचे आयुष्यभर रक्षण करण्याची शपथ घेतली.

सकाळपासूनच बाजारपेठांमध्ये राख्या, गोडधोड व भेटवस्तू खरेदीसाठी गर्दी पाहायला मिळाली. पारंपरिक पद्धतीने पूजा करून राखी बांधल्यानंतर भावंडांनी एकमेकांना मिठाई भरवून सणाचा आनंद लुटला.काही ठिकाणी लहान मुलांनी व ज्येष्ठांनीही हा सण साजरा करून कुटुंबातील एकात्मतेचा संदेश दिला.

या निमित्ताने अनेक सामाजिक संस्थांनी अनाथालये व वृद्धाश्रमात जाऊन रहिवाशांच्या मनगटावर राखी बांधून त्यांना कुटुंबाचा उबदारपणा जाणवून दिला.तसेच, पोलिस,सैनिक व आरोग्य सेवकांना राखी बांधून त्यांच्या सेवेला सलाम करण्यात आला.राज्यातील विविध भागांत हा सण आपापल्या पारंपरिक पद्धतीने आणि आनंदमय वातावरणात पार पडला.

## बीडचे भूमिपुत्र,हाडामासाचे नाट्य तथा सिने कलावंत

# जतीन वाघमारे लोकशाहीर अण्णाभाऊ भाऊ राष्ट्रीय सन्मान पुरस्काराने सन्मानित

**बीड | प्रतिनिधी**



कलाकार म्हटलं कि धर्म,जात,वंश यांच्या पलीकडे जाऊन आणी फक्त चेहऱ्यावर रंग फासून आपल्या आयुष्यातील सुख दुःखावर पांघरून घालून मिळालेल्या भूमिकेला न्याय देत जिवन जगणारा निस्वार्थी जिव. त्याला भूक असते ती फक्त प्रेक्षकांच्या एका टाळीची आणी मनमुराद दादेची. बीड जिल्हा तसे पाहता कलाकारांचा बालेकिल्ला मानला जातो, कारण याच बीड जिल्ह्याच्या मातीने रंगभूमीला आणी सिने क्षेत्राला एका पेक्षा एक असे सरस कलावंत दिले आहेत. आजही या मातीतले कलावंत विविध क्षेत्रात बीड जिल्ह्याची यशस्वी पताका फडकवत आहेत. अशाच एका हरहुन्नरी, हाडामासाच्या, आणी ज्याच्या रक्तात कला आहे अशा नाट्य तथा सिने कलावंतांची दखल घेतली आहे कोल्हापूरकरांनी. आणी या भूमिपुत्र कलावंताचे नाव आहे जतीन छगनराव वाघमारे एकांकिका, दोन अंकी नाटक, राज्य नाट्य स्पर्धा, व्यवसयिक नाटक ते शॉर्ट फिल्म, वेब सिरिज,मराठी सिनेमा अशा विविध कलाक्षेत्रात मजल मारणाऱ्या जतीन वाघमारे या कलावंतांची दखल घेतली आहे ते मानवतावादी संस्कृतीक चळवळ धम्म भवन चारिटेबल ट्रस्ट च्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५व्या जयंती निमित्त आयोजित केल्या गेलेल्या लोक शाहीर अन्नाभाऊ राष्ट्रीय सन्मान पुरस्काराने.मानवतावादी संस्कृतीक चळवळ धम्म भवन चारिटेबल ट्रस्ट कोल्हापूर ही दरवर्षी अण्णाभाऊ साठेच्या जयंती सोहळ्याच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यातील व्यक्ती विशेष असणाऱ्यांचा शोध घेऊन दिमाखदार सोहळ्यात त्या व्यक्ती विशेषाचा पुरस्कार देऊन सन्मान करते. यंदा च्या या पुरस्कार सोहळ्यासाठी बीड जिल्ह्यातून हाडामासाचे कलावंत असणारे, ज्यांनी आपले आयुष्य जणू कलेस समर्पित केले आहे अशा जतीन वाघमारेयांची निवड या पुरस्कार सोहळ्यासाठी झाली होती. आणी हा पुरस्कार सोहळा दिनांक ३ ऑगस्ट रोजी कोल्हापूरच्या राजर्षी शाहू महाराज स्मारक भवन, मिनी सभागृह या ठिकाणी पार पडला. बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र कलावंत जतीन वाघमारे यांना मानाचा फेटा, सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र, राजर्षी शाहू महाराजांची प्रतिमा आणी पुस्तके अशा स्वरूपातील पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. कला हाच ध्यास मनी ठेवून कलेशी प्रामाणिक राहून, कला हेच जिवन जगणाऱ्या जतीन वाघमारे यांना चित्रनगरी कोल्हापूर नगरीत मनाचा अन्नाभाऊ राष्ट्रीय सन्मान पुरस्कार देऊन सन्मानित केल्यामुळे कलाकारांचा बालेकिल्ला बीड जिल्हा... बीड जिल्हा.... या कलावंताच्या घोषनेचे सार्थक झाले आहे अशा भावना बीड जिल्ह्यातील कलावंतानी व्यक्त केल्या आहेत. जतीन वाघमारे यांना अण्णाभाऊ राष्ट्रीय सन्मान पुरस्कार मिळाल्यामुळे सिने दिग्दर्शक प्रवीण वडमारे, सिने कलावंत महादेव सवाई, सिने लेखक तथा सिने कलावंत डॉ. सुधीर निकम. राहुल साळवे. हेमंत प्रधान.ऍड.राहुल वडमारे, ऍड. प्रशांत जाधव,नितीन प्रधान, ऍड. रंजित वाघमारे आणी बीड जिल्ह्यातील नाट्य तथा सिने क्षेत्रात काम करणाऱ्या कलावंतानी पुरस्कार प्राप्त जतीन वाघमारे यांचे अभिनंदन केले आहे.

# जागतिक आदिवासी दिवस तळोदा येथे उत्साहात साजरा



**नंदुरबार | दिपक गोसावी.**

दिनांक ९ ऑगस्ट २०२५ तळोदा येथे जागतिक आदिवासी गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने शहरातील बिरसा मुंडा चौकात भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजनमाल्यार्पण करण्यात आले.

यावेळी शहादा तळोदा मतदार संघाचे आमदार राजेश पाडवी, माजी क्रीडा मंत्री पद्माकर वळवी, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा सीमा वळवी, गौरव वाणी, जितेंद्र सूर्यवंशी, विवेक पाडवी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सकाळी ११ वाजता सर्वपक्षीय नेते, आदिवासी समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती आणि इतर समाजातील मान्यवरांच्या उपस्थितीत बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

या कार्यक्रमाला तळोदा तालुक्यातील शेकडो आदिवासी बांधवांनी हजेरी लावली. देवमोगरा मातेच्या आरतीने रॅलीची सुरुवात झाली. ही रॅली स्मारक चौकातून पुढे मार्गस्थ झाली, तेव्हा रस्त्यावर जमलेला जनसमुदाय सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. हा दिवस आदिवासी संस्कृती आणि परंपरांचा सन्मान करणारा ठरला.

# सशक्त समाज उभारणीसाठी प्रत्येकाने 'मानसशास्त्र' समजून घ्यावे-सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.इंगोले

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

समाजात घडणाऱ्या प्रत्येक घडामोडी या मानवी मनाच्या बदलांमधून घडत असतात. त्यामुळे समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी समाजातील व्यक्तीचे निकोप मन व निरोगी मानसिक आरोग्य असणे गरजेचे आहे. त्यामुळे समाज उभारणीसाठी समाजातील प्रत्येक घटकाला मानसशास्त्राचा अभ्यास असणे गरजेचे आहे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी केले.

येथील मानवलोक संस्थेद्वारा संचलित सोशल वर्क महाविद्यालयात आयोजित मानसशास्त्रीय वैद्यकीय परिषदेत ते प्रमुख व्याख्याता म्हणून बोलत होते. यावेळी विचारमंचावर प्राचार्य डॉ.प्रकाश जाधव, क्षेत्र कार्य समन्वयक प्रा.सुकेशिनी जोगदंड, प्रा.डॉ.नजीर शेख, प्रा.डॉ.अरूंधती पाटील, प्रा.डॉ.किसन शिनगारे, डॉ.वनिता माने, बिभीषण घाडगे यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी विविध मानसिक आजार त्यांची लक्षणे त्यावरील उपाययोजना यावर विस्तृत मार्गदर्शन आपल्या खुमासदार शैलीत विद्यार्थ्यांना केले. विविध उदाहरणे देत विविध मानसिक आजारांचे विद्यार्थ्यांना समजेल अशा भाषेत विश्लेषण करीत विविध मानसिक आजार विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. समाजात वावरत असताना आपल्या आजूबाजूला ताण-तणावांनी ग्रस्त व्यक्ती किंवा मानसिक व्याधींनी ग्रस्त व्यक्ती आपणांस पहावयास मिळतात. परंतु, ते मानसिक आजारच आहेत याची कल्पना नसल्याने अशा व्यक्ती उपचार न मिळाल्यामुळे आत्महत्या किंवा आपल्या हिताला किंवा समाजाच्या हिताला बाधा पोहचेल अशा कृती करीत असतात मानसिक शास्त्रांचा अभ्यास झाल्यास अशा व्यक्ती आपल्याला योग्य त्या औषधोपचार व समुपदेशनाकरिता मानसोपचार तज्ज्ञांकडे पाठविता येतात व घडणाऱ्या संभाव्य दुष्परिणामांना रोखले जाऊ शकते. सामाजिक




शास्त्रांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना आवर्जून मानसशास्त्र शिकविले गेले पाहिजे, ज्यामुळे ही मुले समाजात वावरत असताना या विषयीचे जनप्रबोधन करू शकतील. यावेळी डॉ.इंगोले यांनी व्यक्ती तेवढ्या प्रवृत्ती असे सांगत प्रत्येक व्यक्तीचे व्यक्तिमत्व हे वेगळे असते. प्रत्येक व्यक्तीमध्ये काही ना काही व्यक्तीदोष असू शकतात. प्रत्येक व्यक्ती हा सर्व गुणसंपन्न असू शकत नाही त्यामुळे आपल्यातील गुण दोष शोधून त्याला दुरूस्त करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला माणूस शास्त्रीय दृष्टिकोनातून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करण्यासाठी मानसशास्त्राचा अभ्यास असणे गरजेचे आहे. आपल्यातील गुण दोष आढळल्याने आपल्या जीवनामध्ये अमुलाग्र बदल घडवून आणता येऊ शकतो याच प्रक्रियेला ट्रान्सफॉर्मेशन असं म्हणतात असे डॉ.इंगोले यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.प्रकाश जाधव यांनी सांगितले की, डॉ.इंगोले यांचे आजचे व्याख्यान ही विद्यार्थ्यांसाठी एक मानसशास्त्रीय वैचारिक मेजवानीच होती. आणि विद्यार्थ्यांनी मनमुरादपणे या मेजवानीचा आनंद लुटला असे सांगत निरोगी शरीराबरोबरच निरोगी मन असणे ही काळाची गरज असल्याचे प्राचार्य डॉ.जाधव सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.किसन शिनगारे यांनी केले. तर कार्यक्रमाचे अभिप्राय वाचन स्वप्नाली, विजयकुमार व निशिगंध यांनी करीत विद्यार्थ्यांतर्फे आभार प्रदर्शन बालाजी किर्तने यांनी केले.

## पवनराजे इंग्लिश स्कूलमध्ये रक्षाबंधन सण उत्साहात व आनंदाच्या वातावरणात साजरा

**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील नामांकित पवनराजे इंग्लिश स्कूलमध्ये बंधू-भगिनीच्या प्रेमाचे प्रतीक असलेला रक्षाबंधन सण उत्साह, आनंद आणि आपुलकीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळपासूनच शाळेच्या परिसरात विद्यार्थ्यांचा उत्साह आणि रंगीबेरंगी पोशाखांमुळे वातावरण अधिकच देखणे झाले होते.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थापक अध्यक्ष खंडेराव चौरे यांनी भूषविले, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रिन्सिपल अशोक मस्के सर आणि रामेश्वर घुले सर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक चौरे मॅडम यांनी सादर केले. रक्षाबंधनाचे महत्त्व, त्यामागील सांस्कृतिक वारसा आणि आजच्या काळातील गरज या विषयांवर प्रिन्सिपल अशोक मस्के, रामेश्वर घुले सर आणि दळवे मॅडम यांनी मनोगत व्यक्त केले.

अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचा पुष्पगुच्छ व शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. सत्कारानंतर कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन इयत्ता दहावी, नववी व आठवीच्या विद्यार्थिनींनी प्रमुख पाहुण्यांना राखी बांधून



केले. यावेळी भाव-बहिणीचे नाते हे केवळ परंपरा नसून एकमेकांप्रती असलेली जबाबदारी व प्रेमाचे प्रतीक आहे असा संदेश देण्यात आला.

सुत्रसंचालन अजय भांगे यांनी विनोदी व ओघवत्या शैलीत केले, तर आभार प्रदर्शन अश्विनी मॅडम यांनी मानले.कार्यक्रमास चौरे मॅडम, डि. एस. चौरे सर, पठाण सर, युवराज मगर सर, पारखे मॅडम, केदार मॅडम, जाधव मॅडम, टेकाळे मॅडम, मुळे मॅडम, प्राची मॅडम, संजना मॅडम, अक्षता मॅडम, प्रगती मॅडम, अमृता मॅडम, लक्ष्मी मॅडम, सानिया मॅडम, विशाल सर, राऊत सर, काळे सर, निखिल भांगे सर यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या विशेष दिवशी शाळेत सर्वत्र आनंदाचे वातावरण होते. रक्षाबंधनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये ऐक्य, परस्पर विश्वास आणि आपुलकीचा संदेश पसरविण्यात आला. कार्यक्रमाच्या अखेरीस विद्यार्थ्यांनी एकमेकांना गोडधोड वाटून सणाचा आनंद द्विगुणित केला.

## जीवन विकास शिक्षण मंडळ, केज व कोकिळ परिवार यांच्या वतीने भव्य शालेय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**केज । प्रतिनिधी**

जीवन विकास शिक्षण मंडळ, केज संचलित स्वामी विवेकानंद विद्यामंदीर व स्व. प्रमोद महाजन विज्ञान व कला कनिष्ठ महाविद्यालय केज चे भाग्यविधाते तसेच संस्थेचे संस्थापक सचिव स्व. विश्वंभर ( काका ) कोकिळ यांच्या ८ व्या पुण्यतिथी निमित्त भव्य शालेय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन जीवन विकास शिक्षण मंडळ, केज व कोकिळ परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येत आहे. सदरील स्पर्धा दि. २० ऑगस्ट २०२५ वार बुधवार रोजी केज येथील स्वामी विवेकानंद विद्यामंदिर ( माध्यमिक विभाग ) या शाळेमध्ये ठिक १० वाजता सुरू होणार आहे.

ही स्पर्धा ५ वी ते ७ वी तसेच ८ वी ते १० वी या दोन गटात पार पडणार आहे.

पहिला गट इयत्ता ५ वी ते ७ वी- वक्तृत्व स्पर्धेचा विषय मरावे परी कीर्तीरूपी उरावे

दुसरा गट इयत्ता ८ वी ते १० वी वक्तृत्व स्पर्धेचा विषय सामाजिक समतेसाठी माझी भूमिका



पारितोषिके-

पहिला गट- प्रथम- २१०८ रुपये, द्वितीय- १५०८ रुपये, तृतीय- ११०८ रुपये, उत्तेजनार्थ- ५०८ रुपये.

दुसरा गट- प्रथम- ३१०८ रुपये, द्वितीय- २१०८ रुपये, तृतीय- ११०८ रुपये, उत्तेजनार्थ- ५०८ रुपये. तसेच सर्व विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र दिले जाणार आहे. या स्पर्धेसाठी लहान गटास ५ मिनिटे व मोठ्या गटात ७ मिनिटे दिले जातील. प्रत्येक वक्तृत्व स्पर्धेमध्ये एक विद्यार्थी वक्ता भाग घेवू शकतो. सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येतील. स्पर्धा संपताच बक्षिस वितरण केले जाईल. सदरील स्पर्धा मराठवाड्यातील सर्व शालेय विद्यार्थ्यांसाठी खुली आहे. तरी आपला उत्स्फूर्त प्रतिसाद हा आमच्या संस्थेच्या उपक्रमाची यशस्विता आहे. म्हणून सदरील स्पर्धेसाठी आपल्या शाळेचे दोन्ही गटासाठी प्रत्येकी एक विद्यार्थी वक्ता पाठवून सहकार्य करावे असे आवाहन जीवन विकास शिक्षण मंडळ केज तसेच कोकिळ परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. स्पर्धकांच्या नोंदणीसाठी संपर्क सत्वधर सर ९४२३१७०५८६ समुद्रे सर ९८२३२१६३७८ सदरील स्पर्धेसाठी स्पर्धकांनी पूर्व नोंदणी करणे आवश्यक आहे.

## श्रीकृष्ण मीत्रमंडळ आयोजीत श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळया निमीत्त भागवत कथेसह विविध ऊपक्रमांचे आयोजन-राजकुमार डाके

**परळी । प्रतिनीधी**

प्रतिवर्षा प्रमाणे याहिवर्षी श्रीकृष्ण मीत्र मंडळ, श्री नर्मदेश्वर गुरुकुल व श्री ज्ञानबोधीनी विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने भव्य श्रीकृष्ण जन्मोत्सवा निमीत्त भागवताचार्य श्री ह.भ.प. सिद्धेश्वर महाराज शास्त्री श्री क्षेत्र आळंदी यांच्या रसाळ वाणीतुन श्रीमद भागवत कथा, वृक्षारोपन, आरोग्य शिबीर, शालेय स्पर्धा, दींडी सोहळा व भव्य दहिहंडी सोहळा, काल्याचे कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्याहाची सुरुवात आज श्री नर्मदेश्वर गुरुकुल येथे कलश पुजन करुण भागवत कथेस प्रारंभ करण्यात येणार आहे. या सर्व कार्यक्रमाचा जास्तीत जास्त भाविक भक्तांनी लाभ घेण्याचे आव्हाण श्रीकृष्ण मीत्रमंडळाचे संस्थापक अध्यक्षग राजकुमार डाके, श्री ज्ञानबोधीनी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री लक्ष्मणराव मुंडे सर व श्री नर्मदेश्वर गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष श्री ह.भ.प. अर्जुन महाराज शिंदे आचार्यजी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

श्रीकृष्ण मीत्र मंडळ आयोजीत श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळया नीमीत्त भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असुन त्यानिमीत्त आज दिनांक १०/०८ रोजी सकाळी ११ वाजता श्री नर्मदेश्वर गुरुकुल या ठीकाणी कलशपुजन करुण टाळ, मृदंग व वीण्याची पुजा करुण श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळयास प्रारंभ होईल रविवार दिनांक १०/०८ ते शनिवार दिनांक १६/०८ रोज दुपारी ठीक ०२ ते ०५ या वेळेत भागवताचार्य श्री ह.भ.प. सिद्धेश्वर महाराज शास्त्रीजी श्री क्षेत्र आळंदी देवाची यांच्या रसाळवाणीतुन श्रीमद् भागवत कथा होईल. शुक्रवार दिनांक १५/०८ रोजी रात्री ०९ ते १२ श्री ह.भ.प. अर्जुन महाराज शिंदे शास्त्रीजी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळा व दीपोत्सव सोहळा संपन्न होईल. शनिवार दिनांक १६/०८ रोजी भागवत कथेची समाप्ती होऊन



भव्य दींडी सोहळा होईल व त्यानंतर दुपारी ठीक ०४ वाजता श्री ज्ञानबोधीनी विद्यालय येथे श्रीराधाकृष्ण रुप सज्जा स्पर्धा होऊन अनेक मांन्यवरांच्या प्रमुख ऊपस्थीतीत भव्य दहिहंडी सोहळा संपन्न होईल व रविवार दिनांक १७/०८ रोजी सकाळी १० ते १२ काल्याचे कीर्तन होऊन महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहा मध्ये प्रतिवर्षाप्रमाणे याहिवर्षी सामाजिक, सांस्कृतीक व शालेय ऊपक्रमां अंतर्गत श्री ज्ञानबोधीनी विद्यालय येथे दिनांक १०/०८ रोजी दीपप्रज्वलन, सोमवार दि.११/०८ वृक्षारोपन, मंगळवार दि. १२/०८ शालेय स्पर्धा, बुधवार दि. १३/०८ आरोग्य तपासणी शिबीर, गुरुवार दि. १४/०८ रांगोळी स्पर्धा, शुक्रवार दि.१५/०८ रोजी स्वातंत्र्य दिनानिमीत्त व्याख्यान व शनिवार दि. १६/०८ रोजी श्री राधा कृष्ण रुप सज्जा स्पर्धा होऊन अनेक मांन्यवरांच्या प्रमुख ऊपस्थीतीत भव्य दहिहंडी सोहळा संपन्न होईल. तरी या सर्व कार्यक्रमाचा सर्व भावीक भक्तांनी मोठया संखेने लाभ घेण्याचे आव्हाण श्रीकृष्ण मीत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार डाके, श्री ज्ञानबोधीनी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री लक्ष्मणरावजी मुंडे सर व श्री नर्मदेश्वर गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष श्री ह.भ.प.अर्जुन महाराज शिंदे शास्त्रीजी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## पोलीस अधीक्षक साहेब,अर्चना कुटे व कृष्णा आंधळे ला कधी अटक करायचे-शेख युनूस

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील हरवलेल्या मुलाला सात वर्षानंतर आपण तसेच आपले अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तपास करून आई वडील व मुलाची भेट घडून आणू शकतात तर मग दोन वर्ष खालील फरार आरोपीला आपण का नाही आणू शकत? साहेब ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या संचालीका अर्चना कुटे यांना आपण कधी अटक करणार साहेब त्यांच्यामुळे हजारो घरे उध्वस्त झाली, कुणी आत्महत्या केली, कोणाच्या मुलीचे लग्न मोडले, कोणाच्या मुला मुलीचे शिक्षण थांबले अशा फरार अर्चना कुटे चा आपण कधी शोध लावणार? हा ठेवीदारांना प्रश्न पडलेला आहे.

तसेच मस्साजोग चे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात फरार आरोपी कृष्णा आंधळे त्याचा पण आपण कधी शोध लावणार? ज्या माणसाने घर उध्वस्त केले. देशमुख कुटुंब यांना रोडवर आणले



दारोदारी त्यांना प्रशासनाकडे विनंती करावा लागत आहे अशा आरोपींना धरा साहेब तुमच्याकडून जिल्ह्यातील लोकांच्या खूप अपेक्षा आहे. तुम्हीच न्याय देऊ शकतात.

## संकल्प तुषार होटकर याची राज्यस्तरीय योग स्पर्धेसाठी निवड

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील, संकल्प तुषार होटकर याने जिल्हा



योग स्पर्धेत दुसरा क्रमांक पटकावला असून, त्याची राज्यस्तरीय योग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. संकल्प तुषार होटकर, हा कै.बि.दै.राठी या शाळेमध्ये इयत्ता तिसरी मध्ये शिक्षण घेत असून, ८ ते १० या वयोगटातून त्याची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशोमय वाटचालीसाठी त्याचे जिल्हाभरातून अभिनंदन होत आहे !

## दिल्लीत केंद्रीय मंत्र्यांच्या उपस्थितीत होणार एपीजे अब्दुल कलाम युथ अवॉर्ड कार्यक्रम

### प्रदेश प्रभारी सलीम जहाँगीर यांची माहिती; ५०० अल्पसंख्यांक व्यवसायिकांचा सहभाग

**बीड । प्रतिनिधी**

देशाचे नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील कलाम को सलाम मोहिमेचा एक भाग म्हणून, अल्पसंख्याक मोर्चा अल्पसंख्याक समुदायातील प्रतिभावान व्यावसायिक तरुणांना डॉ. कलाम स्टार्टअप युथ अवॉर्ड २.० पुरस्कार देऊन सन्मानित करणार आहे. दि.१२ ऑगस्ट २०२५ रोजी दिल्लीत हा कार्यक्रम होणार आहे. भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष जमाल सिद्दीकी यांच्या नेतृत्वाखाली देशभरातील अल्पसंख्यांक समाजातील व्यावसायिकांची नोंदणी करण्यात आली असून त्यापैकी महाराष्ट्रातील ५०० अल्पसंख्यांक व्यावसायिकांनी ऑनलाइन नोंदणी करून यात सहभाग घेतल्याची माहिती भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश महामंत्री तथा अभियानाचे प्रदेश प्रभारी सलीम जहाँगीर यांनी दिली.



महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, मंत्री पंकजाताई मुंडे, डॉ. प्रितमताई मुंडे , राज्य अल्पसंख्यांक मोर्चाचे अध्यक्ष इद्रिस मुलतानी यांच्या नेतृत्वाखाली एपीजे अब्दुल कलाम युथ अवॉर्ड समारोह प्रदेश प्रभारी सलीम जहाँगीर यांनी राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील व्यावसायिकांची ऑनलाईन नोंदणी करून घेतली आहे. मिसाइल मॅन ऑफ इंडिया म्हणून ओळखले जाणारे भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या १० व्या पुण्यतिथीनिमित्त १२ ऑगस्ट २०२५ रोजी दिल्ली येथे डॉ. कलाम युथ स्टार्टअप अवॉर्ड- २०२५ कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. राष्ट्रीय स्तरावरील स्टार्टअपबद्दल तरुणांना जागरूक करण्यासाठी राष्ट्रीय अल्पसंख्याक मोर्चाने देशभरातील अल्पसंख्याक समुदायातील प्रतिभावान तरुणांना डॉ. कलाम स्टार्टअप युथ अवॉर्ड २.० देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. हा पुरस्कार नवोन्मेष, अपवादात्मक कौशल्ये आणि उद्योजकीय वृत्तीद्वारे स्वतःचे उद्योग सुरू करणाऱ्या आणि समाजासाठी प्रेरणादायी उदाहरण म्हणून काम करणाऱ्या तरुणांना दिला जाणार आहे. दिल्लीत दि.१२ ऑगस्ट २०२५ रोजी होणाऱ्या कार्यक्रमास केंद्रीय मंत्र्यांसह देशभरातील भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे पदाधिकारी उपस्थित राहणार असल्याची माहिती भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश महामंत्री तथा अभियानाचे प्रदेश प्रभारी सलीम जहाँगीर यांनी दिली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077